# वसई विरार शहर महानगरपालिका
# वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१६/०५/२०२५

## <u>प्रेसनोट</u>

" डेंग्यू हा अतिशय गंभीर आजार आहे. १६ मे हा दिवस **"राष्ट्रीय डेंग्यू दिन"** म्हणून साजरा केला जातो. जनतेमध्ये जागृती निर्माण होऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी नागरीकांचा सहभाग करुन घेण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमाद्वारे नागरीकांपर्यत माहिती पोहचविण्यासाठी १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात येत असतो.

दरवर्षीप्रमाणे या वर्षी ही दि.१६/०५/२०२५ रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात आला. या वर्षाचे घोषवाक्य **"Check, Clean, Cover: Steps to Defeat Dengue"** त्याचे मराठी भाषांतर **"तपासा, स्वच्छ करा आणि झाकून ठेवा: डेंग्यूला हरविण्याचे उपाय करा"** असे आहे.

- मा. वैद्यकीय आरोग्य अधिकारी व मा.साथरोग अधिकारी यांनी डेंग्यू बाबत माहिती मार्गदर्शन सभा घेऊन पुढील नियोजन करण्यास मार्गदर्शन केले.
- आज दि.१६ मे २०२५ रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आरोग्य सेवक, ए.एन.एम, आशा व इतर कर्मचारी तसेच रुग्णालय व आयुष्मान आरोग्य मंदीर यांच्यामार्फत डेंग्यू दिन साजरा करण्यात आला.
- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा आणि इतर कर्मचारी यांच्याद्वारे प्रभात फेरी काढण्यात आली.
- रुग्णालय व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत हस्तपत्रिकांचे वाटप तसेच बॅनर प्रदर्शित करून किटकजन्य आजाराविषयी नागरीकांना आरोग्य शिक्षण देण्यात आले आणि जनजागृती करण्यात आली.
- किटकजन्य आजारांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.
- महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध जनजागृती कार्यक्रम व स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.
- बस स्थानके, बाजारपेठा अश्या गर्दीच्या ठिकाणी डेंग्यूची लक्षणे व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जनजागृती करण्यात आली.
- नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कार्यक्षेत्रातील सफाई कर्मचारी आणि नागरीक यांचे आरोग्य शिबिर भरुन आरोग्य तपासणी करण्यात आली.
- कार्यक्षेत्रातील कारखाने, कंपन्या येथे डेंग्यू नियंत्रण कार्यक्रम राबवून जनजागृती करण्यात आली.
- पावसाळापूर्व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत कार्यक्षेत्रातमध्ये माहिती देण्यात आली.
- नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत कार्यक्षेत्रामध्ये गटसभा भरुन किटकजन्य आजाराविषयी मार्गदर्शन करण्यात आले.
- नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कार्यक्षेत्रामध्ये **<u>"तपासा, स्वच्छ करा आणि झाकून ठेवा: डेंग्यूला हरविण्याचे उपाय करा"</u>** चा संदेश देण्यात आला.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका